**नियमित दिवाणी दावा क्र. ८५८/२०१०**

राजेंद्र शेळके वि. शिलादेवी भांगे व इतर.

**<u>निशाणी ०१ वरील आदेश</u>**

(CNR No.MHSO110011952010)

प्रस्तुतचा दावा वादीने हुकूमी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. रोजनाम्याचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरणात दिनांक ०९.१२.२०२५ रोजी नि.क्र. १३९ वर वादमुद्दे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदरचा दावा दि. १६.१२.२०२५ रोजी वादीच्या पुराव्यासाठी ठेवण्यात आला. दिनांक १६.१२.२०२५ रोजी वादीच्या वतीने कुलमुख्यत्यार पत्र दाखल करण्याचा अर्ज दाखल करण्यात आला. वास्तविक त्या अर्जास पुढील निशाणी क्र. १४० देणे गरजेचे होते. परंतु संबंधीत लिपीक यांनी चुकीने त्या अर्जाला नि.क्र. ७० दिले व त्यानंतर त्यापुढील संपूर्ण अर्ज व कागदपत्र यांना नि.क्र. ७० पुढील निशाणी क्रमांक देण्यात आले.

२. संबंधीत लिपीकाकडून झालेली चुक दुरूस्त करणे गरजेचे असल्याने संबंधीत लिपीक यांनी दिनांक १६.१२.२०२५ रोजी वादीने दाखल केलेला कुलमुख्यत्यारपत्र दाखल करण्याच्या अर्जास नि.क्र. १४० देवून त्यापुढील अर्जास व कागदपत्रांना नि.क्र. १४० नंतरचे निशाणी क्रमांक देण्यात यावे. येणेप्रमाणे निशाणी क्रमांक दुरूस्त करून संबंधीत लिपीक यांनी सदर आदेशाची व दुरूस्त केलेल्या निशाणी क्रमांकाची नोंद रोजनाम्याला घ्यावी. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.02.04 17:18:14 +0530

माळशिरस (यु.बि.पेठे)

दिनांक – ०३/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

माळशिरस

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | |
|---|---|---|
| (a) Name of the Stenographer | :- | M. P. Gheradi. |
| (b) Court | :- | Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Malshiras |
| (c) Judgment/Order signed by PO on | :- | 03.02.2026 |
| (d) Judgment/Order uploaded on | :- | 04.02.2026 |